कायम विना अनुदान

Blossom Public School
Tathawade, Pune-33.
Inward No.: 12
Date : 22/07/2010 Sign:

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य-८/नैवा/ 392 ०८.
पुणे दिनांक 31 /५/२०१०

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, ताथवडे पुणे-३३ संचलित
ब्लॉसम पब्लिक स्कूल, ताथवडे पुणे-३३

विषय - कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीने वर्ग / अतिरिक्कत तुकडया मंजूरीबाबत (इंग्रजी माध्यम)

संदर्भ - शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.नाहप-२००९/ (६६३/०९) माशि-१ दि.७ ऑगस्ट २००९

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया / वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| इयत्ता | वर्ग / तुकडी | मंजूरीचे वर्ष |
|---|---|---|
| इयत्ता २ री | प्रथम वर्ग , नैसर्गिक वाढ | जुन २००६ |
| इयत्ता ३ री | प्रथम वर्ग | ----,,---- |
| इयत्ता ४ थी | प्रथम वर्ग | ----,,---- |
| इयत्ता ५ वी | प्रथम वर्ग | ----,,---- |
| इयत्ता ६ वी | प्रथम वर्ग | ----,,---- |
| इयत्ता ७ वी | प्रथम वर्ग | जुन २००६ |
| इयत्ता ८ वी | नैसर्गिक वाढ | जुन २००७ |
| इयत्ता ९ वी | नैसर्गिक वाढ | जुन २००८ |
| इयत्ता १० वी | नैसर्गिक वाढ | जुन २००९ |

अटी व शर्ती -

१. शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्यात.
२. शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
३. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा सुरु करण्यास दिलेले ना हरकत प्रमाणपत्र कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय काढून घेण्याचा अधिकार राज्य शासनास राहील. तसेच राज्य शासनाने दिलेल्या निर्देशांची सीबीएसई/आयसीएसई/आयबी अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांनी पूर्तता न केल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र कोणतेही कारण दिल्याशिवाय काढून घेण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.
४. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील विदयार्थ्यांचे प्रवेश, बोनाफाईड जन्मपत्राच्या दाखल्यावर करण्यात यावेत.
५. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे राज्य शासनातर्फे शुल्क निर्धारण समितीने केलेले शुल्क आकारले जावे.
६. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळातील वर्गामध्ये विदयार्थीक्षमता / विहित नियमांप्रमाणेच राहील.
७. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळाच्या व्यवस्थापनानी इ.१ ते ५ वीपर्यंत राज्य मंडळाचा इंग्रजी माध्यमाकरीता [illegible] अभ्यासक्रम इ.१ ते ५ वीपर्यंत राबविला जात नाही त्या शाळांनी राज्य मंडळाचा अभ्यासक्रम [illegible] शैक्षणिक वर्षापासून (२०१०-२०११) राबविणे अनिवार्य राहील.

८. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळेमध्ये इ.८ वीपर्यंत त्रिभाषा सूत्र पाळले जावे. मराठी भाषा ही व्दितीय भाषा म्हणून शिकविली जावी.

९. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे व्यवस्थापन ज्यावेळी विविध पदांमध्ये उमेदवारांची नियुक्ती करतेवेळी उपस्थित राहण्याकरीता जिल्हा शिक्षणाधिकारी अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्याला व्यवस्थापनाने आमंत्रित करणे आवश्यक राहील.

१०. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवथापनातर्फे कोणत्याही प्रकारच्या देणग्या विदयार्थी अथवा पालकांकडुन घेण्यात येणार नाहीत.

११. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनातर्फे प्रॉव्हीडंट फंडची योजना कर्मचा-यांसाठी राबविण्यात यावी.

१२. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील विदयार्थी काही कारणास्तव शाळा सोडुन अन्य शाळेत प्रवेश घेवू इच्छित असेल तर अशा कोणत्याही विदयार्थ्यांवर त्याच शाळेमध्ये शिक्षण घेण्याबाबतची सक्ती केली जावू नये.

१३. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील सुरु असलेले वर्ग व विदयार्थी संख्येची माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दि.३१ ऑगस्टपूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

१४. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांतील प्रत्येक वर्गवाढीस संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

१५. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी ट्रॅफीक सेफ्टी गाईड लाईन्सची (पोलीस, अग्निशम व वाहतुक विभाग यांनी निर्धारीत केल्यानुसार) काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१६. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांनी फायर प्रोटेक्शन ॲरेजमेंट (नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया पार्ट-४ फायर प्रोटेक्शन १९९७ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा) संदर्भात नियमानुसार व्यवस्था करणे आवश्यक राहील.

१७. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांच्या व्यवस्थापनांना राज्य शासनाचे सर्व नियम कायदे व आदेश यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१८. सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळा या संपुर्णत व्यवस्थापनातर्फे स्वयंनिधीतुन चालविल्या जातील व शासनाकडुन त्यांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

१९. शासनातर्फे दिले जाणारे ना हरकत प्रमाणपत्र इ.१२ वी पर्यंत लागू राहील.

२०. शासनाने मागितलेली कोणतीही माहिती सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई मंडळाशी संलग्नित शाळांनी देणे बंधनकारक राहील. तसेच या शाळांची शैक्षणिक / लेखाविषयक तपासणी करण्याचे अधिकारदेखील राज्य शासनास राहतील.

२१. शासनाच्या नियमांची अटी, शर्तींची पुर्तता करणार नाही अशा शाळांचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे